सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

**क्रमांक :** एलजेआर-१९२६/प्र.क्र.२४/२०२६/जाहिरात **जाहिरात क्रमांक : ०१५/२०२६**

## मुंबईचे नगरपाल (शेरिफ) कार्यालयातील बेलिफ व लिपिक, गट-क स्पर्धा परीक्षा – २०२६

शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या अखत्यारीतील **मुंबईचे नगरपाल (शेरिफ) कार्यालयातील बेलिफ व लिपिक, गट-क** पदावर निवडीद्वारे नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **बेलिफ व लिपिक, गट-क स्पर्धा परीक्षा – २०२६** आयोजित करण्यात येईल. **प्रस्तुत परीक्षेचा दिनांक व परीक्षा केंद्र स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.**

**२. अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/कालावधी:-**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | **दिनांक १७ जून, २०२६ रोजी १४.०० ते दिनांक ०७ जुलै, २०२६ रोजी २३:५९** |
| २ | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक ०७ जुलै, २०२६ रोजी २३:५९** |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | **दिनांक ०९ जुलै, २०२६ रोजी २३:५९** |
| ४ | चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक १० जुलै, २०२६ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

**३.** प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदांचा व इतर तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| मुंबईचे नगरपाल (शेरिफ) कार्यालयातील बेलिफ व लिपिक, गट-क (एकूण २० पदे) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | सा. आणि शै. मागास वर्ग. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
| पदसंख्या | ३ | २ | १ | १ | -- | १ | ६ | -- | ३ | ३ | २० | -- | २० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | -- | -- | ५ | -- | २ | २ | १४ | -- | १४ |
| (२) महिला | १ | १ | -- | -- | -- | १ | १ | -- | १ | १ | ६ | -- | ६ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४) माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (५) दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| (६) अनाथ | -- | | | | | | | | | | | | |

**४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

**४.१** शासनाकडून पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल प्राप्त झाल्यास याबाबतची माहिती / बदल वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**४.२ विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ, दिव्यांग इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार / निर्णयानुसार राहील.**

**४.३** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती. (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, समाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग आणि इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी ते समाजातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नाहीत, असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतचे सक्षम प्रधिकाऱ्याने प्रदान केलेले विहित नमुन्यातील वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**४.४** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच **प्रस्तुत संवर्गाकरिता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा दावा केलेल्या उमेदवारांनी सन २०२६ – २०२७ या आर्थिक वर्षाचे तथापि अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक (दिनांक ०७ जुलै, २०२६) किंवा त्यापूर्वीचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.**

**४.५** सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन प्रसिध्द करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारशी व नियुक्त्या उक्त उल्लेखित न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन करण्यात येतील. त्याअनुषंगाने आयोगामार्फत दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले प्रसिध्दीपत्रक जाहिरातीस लागू राहील.

४.६ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-२०२४/ प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक २८ जून, २०२४ व दिनांक ०५ जुलै, २०२४ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४.७ शासन शुध्दीपत्रक, इतर समाज बहुजन कल्याण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ०९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी कालावधी विचारात घेण्यात येईल. **प्रस्तुत संवर्गाकरीता सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाचे उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील**.

४.८ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.९ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्रांचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागू असेल त्याप्रमाणे) ग्राह्य समजण्यात येईल.

४.१० सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**४.११ दिव्यांग आरक्षण:-**

**४.११.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ आणि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : दिव्यांग-२०२५/प्र.क्र.३७/आरक्षण-१, दिनांक ३१ जुलै, २०२५ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**४.११.**२ शासन निर्णय, विधी व न्याय विभाग, क्रमांक:शेरीफ-१६२१/प्र.क्र.३३/का-९, दिनांक १६ जून, २०२१ अन्वये खालील दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती /उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत:-

१) Low Vision, २) One Leg, One Arm, Spinal deformity(SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/ limb dysfunction, Leprosy Cured, Dwarfism, Acid Attack Victim, ३) Autism Specturm Disorder(Mild), Specific Learning Disability, Mental Illness (४) Multiple Disability involving (१) to (३) above

**४.११.३** लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**४.११.४** शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक: दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२, दिनांक २७ जून, २०२४ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये / भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या / येणाऱ्या वैद्यकीय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त होईपर्यन्तच्या कालावधीसाठी दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाच्या सवलती / योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांचेकडे असलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्रासोबत वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrollment Number) सादर करणे अनिवार्य राहील.

**४.११.५** महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त नमूद दिनांक २७ जून, २०२४ रोजीच्या परिपत्रकाद्वारे दिव्यांग व्यक्तींना आरक्षणासह सर्व सुविधा व लाभ मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) आयोगाद्वारे आयोजित सर्व पदभरतीकरीता अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याबाबत दिनांक २१ एप्रिल, २०२४ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

**४.११.६** सदर शासन परिपत्रकास अनुसरुन आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या खात्यामध्ये दिव्यांग उमेदवारांचा वैश्विक ओळखपत्र क्रमांक नोंद करण्याची तसेच दिव्यांग उमेदवारांनी त्यांच्या खात्यामध्ये दिलेला दिव्यांगत्वाचा तपशील केंद्र शासनाच्या स्वावलंबन पोर्टलवरुन विधिग्राह्य (Validate) करुन घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**४.११.७ दिव्यांग तपशील विधिग्राह्य होण्याकरीता दिव्यांग उमेदवारांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असेल :-**

(१) स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र क्रमांक अशा दोन्ही बाबी उपलब्ध असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी सदर दोन्ही तपशील नोंदविणे आवश्यक आहे.

(२) ज्या उमेदवारांकडे सद्यस्थितीत स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र नाही. तथापि, राज्य शासनाच्या SADM पोर्टलवरुन वितरित करण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र आहे, अशा उमेदवारांनी SADM प्रमाणपत्रासह वैश्विक ओळखपत्रासाठी नोंदणी केल्याचा क्रमांक (Enrolment Number) नोंदविणे अनिवार्य असेल. तथापि, सदर उमेदवारांना मुलाखतीपूर्वी वैश्विक ओळखपत्र सादर करणे आवश्यक असेल.

(३) उमेदवारांनी खात्यामधील दिव्यांगत्वाचा सर्व आवश्यक तपशील अचूकपणे नोंदवावा. दिव्यांगत्वाचा तपशील नोंदविताना तो दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्रावर नमूद केल्याप्रमाणेच असल्याची खात्री करावी. उदा. दिव्यांग प्रमाणपत्र क्रमांक, दिव्यांगत्वाची टक्केवारी, वैश्विक ओळखपत्र क्रमांक, वैश्विक ओळखपत्र वितरणाचा दिनांक इत्यादी तपशील वैश्विक ओळखपत्राप्रमाणेच असणे आवश्यक आहे.

(४) दिव्यांगत्वाचा सर्व तपशील अचूकपणे नोंदविल्यानंतर 'Validate' या बटनवर क्लिक करावे.

(५) उमेदवाराचे वैश्विक ओळखपत्रावर नमूद नाव, दिव्यांगत्वाचा प्रकार व दिव्यांग स्थिती (कायमस्वरुपी/तात्पुरते) इत्यादी तपशील दर्शविले जाईल व सदर तपशील अचूक असल्याचे उमेदवाराने संबंधित बटनवर क्लिक करुन प्रमाणित केल्यानंतर दिव्यांग तपशील विधिग्राह्य करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

(६) दिव्यांग तपशील विधिग्राह्य होण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होण्यासाठी उमेदवाराच्या खात्यामध्ये नमूद जन्मदिनांक व वैश्विक ओळखपत्राकरीता नमूद जन्मदिनांक एकच असणे तसेच दिव्यांगत्वाचा सर्व तपशील अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे.

**४.११.८ दिव्यांग तपशील विधिग्राह्य असल्याशिवाय दिव्यांग उमेदवारांना कोणत्याही जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करता येणार नाही.**

**४.११.९** लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार / उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

**४.१२ दिव्यांग उमेदवार :- लेखनिक आणि / अथवा अनुग्रह कालावधीबाबत**

**४.१२.१** लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : दिव्यांग२०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या ‘ लक्षणीय (Benchmark)दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका-२०२१’ तसेच तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**४.१२.२** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**४.१२.३** लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

**४.१२.४** अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

**४.१२.५** परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

**४.१२.६** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या “दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना” चे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

**५. वेतनश्रेणी :-** S-६ : रुपये १९९००-६३२००/- अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते.

**६. पात्रता :-**

**६.१ भारतीय नागरिकत्व**

**६.२ वयोमर्यादा :- दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२६ रोजी**

| वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **किमान अमागास / मागासवर्गीय/ आ. दु. घ.** | कमाल | | **प्राविण्य प्राप्त खेळाडू** | | **माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी** | | **दिव्यांग उमेदवार** |
| | **अमागास** | **मागासवर्गीय/ अनाथ/आ.दु. घ.** | **अमागास** | **मागासवर्गीय/ आ. दु. घ.** | **अमागास** | **मागासवर्गीय/ आ. दु. घ.** | |
| १९ | --- | ४३ | -- | ४३ | -- | ४३+ सेवा कालावधी +३ वर्षे | **वयाच्या ४५ वर्षापर्यंत** |

**६.३** मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग, अनाथ आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकत्तम असलेली एकच सवलत देय राहील.

**७. अर्हता :-**

**७.१ शैक्षणिक अर्हता:-.**

**(एक)** सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता .

**(दोन)**अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट, अर्ज स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

**(तीन)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

**७.२. टंकलेखन अर्हता :-**

**(एक) बेलिफ व लिपिक संवर्गासाठी उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालीलप्रमाणे टंकलेखन अर्हता असणे आवश्यक आहे :-**

| **बेलिफ व लिपिक** |
|---|
| मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट **किंवा** इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. |

**(दोन)** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : एसपीई १०१२/(१०८/१२)/साशि-१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहित केलेली संगणक टंकलेखन अर्हता- बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट अथवा बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट (लागू असेल त्याप्रमाणे) समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.

**(तीन)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-२०२३/प्र.क्र.१/कार्यासन-१२, दिनांक १२ जानेवारी, २०२३ अनुसार केवळ इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवाराची बेलिफ व लिपिक / लिपिक-टंकलेखक संवर्गामध्ये नियुक्ती झाल्यानंतर त्याने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे आहे. तसेच, केवळ मराठी टंकलेखन धारण करणाऱ्या उमेदवाराची इंग्रजी भाषेत बहुतांश कामकाज होत असलेल्या विशिष्ट कार्यालयात (उदा. न्यायालय व न्यायाधिकरणातील सरकारी वकिलांची कार्यालये इत्यादी) बेलिफ व लिपिक / लिपिक-टंकलेखक संवर्गामध्ये नियुक्ती झाल्यानंतर त्याने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे राहील. अन्यथा संबंधितांची वेतनवाढ रोखण्यात येईल.

**७.३ टंकलेखन अर्हता धारण करण्यातून तात्पुरती सूट :-**

(१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ नुसार दिव्यांग उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे दिव्यांग आरक्षणाचा दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३ जून, २०१९ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे माजी सैनिक आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

(३) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक: अनाथ-२०२२/प्र.क्र.८४/का-०३, दिनांक ०७ जुलै, २०२२ अन्वये अनाथ उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

**७.४ अर्हता/पात्रता गणण्याचा दिनांक :-**

**(एक)** अर्ज स्वीकारण्यासाठी विहित अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे अनिवार्य आहे.

**(दोन)** शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाची विहित टंकलेखन अर्हता अथवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास अथवा त्यापुर्वी धारण करणे अनिवार्य आहे.

**८. परीक्षा योजना :-**

**८.१ परीक्षेचे टप्पे :- एक - लेखी परीक्षा**

**८.२ परीक्षेचे स्वरुप :- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी**

**८.३ प्रश्नपत्रिका :- दोन**

**८.४ एकूण गुण :- ४०० (प्रत्येकी २०० गुण असलेली)**

**८.५ परीक्षेचे स्वरुप टप्पे —**

**८.५.१ लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे:-**

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| (संकेतांक ११९३) | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (संकेतांक ११९४) | सामान्य अध्ययन व बुध्दिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | |

**८.५.२ बेलिफ व लिपिक, गट-क स्पर्धा परीक्षा — २०२६** परीक्षेमधून भरावयाच्या पद भरतीकरीता एकच परीक्षा घेण्यात येईल.

**८.५.३ अभ्यासक्रम** :- सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील 'Candidate Information' या सदराखालील 'Examination' अंतर्गत 'Syllabus of Examination' येथे उपलब्ध आहे.

**८.६ उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन:-**

**८.६.१** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील.

**८.६.२** एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील.

**८.६.३** एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

**८.६.४** वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

**८.७ अंतिम निकाल प्रक्रिया**

**८.७.१ बेलिफ व लिपिक, गट-क पदाकरीता स्पर्धा परीक्षा — २०२६ च्या** लेखी परीक्षेमधील परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार यादी (Merit List) अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

**८.७.२** सामाजिक तसेच समांतर आरक्षणाच्या वैध दाव्यांच्या आधारे संबंधित उमेदवार लेखी परीक्षेमध्ये केवळ आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी विहित केलेल्या गुणांच्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ संबंधित आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गाच्या गुणांच्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अराखीव (खुला) पदावरील निवड/शिफारसीसाठी पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**८.७.३** गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची क्रमवारी (Ranking) **आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार** ठरविण्यात येईल.

**८.७.४ बेलिफ** व लिपिक, गट-क पदाकरीता स्पर्धा परीक्षा — २०२६ करीता प्रतिक्षा यादी आयोगाकडून निश्चित केलेल्या धोरणानुसार राहील.

**९. परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत :-**

**९.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

**(एक)** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर यापूर्वी विहित पद्धतीने नोंदणी केली नसल्यास, नोंदणी करून खाते (Profile) तयार करणे.

**(दोन)** खाते तयार केलेले असल्यास व ते अद्ययावत करण्याची आवश्यकता असल्यास, अद्ययावत करणे.

**(तीन) आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील उमेदवाराच्या खात्याची केवायसी (KYC) करण्याकरीता आयोगाच्या संकेतस्थळावरील क्रमांक : एडीआर-२४२५/सी.आर.०६/२०२५/मा.तं.,दिनांक २० जून, २०२५ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे विहित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही पूर्ण करण्याकरीता स्वतंत्रपणे कालावधी उपलब्ध करून देण्यात येईल. सदर कालावधीमध्ये खात्याची केवायसी (KYC) प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य राहील.**

**(चार)**विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने पुढीलप्रमाणे लागू असेल त्यानुसार आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे .

**(पाच)** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**(सहा)** जिल्हा केंद्र निवड करणे.

**(सात)** जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी आयोगाच्या संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

**९.२ विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-**

**(एक)** प्रोफाईलमध्ये केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ. क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | **अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता)** | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | टंकलेखनाचे प्रमाणपत्र (मराठी किंवा इंग्रजी किंवा दोन्ही - लागू असेल त्याप्रमाणे) | | | |
| ५ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा **(सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाचे तथापि अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक (दिनांक ०७ जुलै, २०२६) व त्यापूर्वीचे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.)** | PDF | ५० | ५०० |
| ७ | वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र **(सन २०२६ - २०२७)** | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र (UDID Card) किंवा वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrollment Number) | PDF | ५० | ५०० |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | **खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा :** क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. | PDF | ५० | ५०० |
| १२ | अराखीव महिला, मागासवर्गीय, आ.दु.घ., खेळाडू, दिव्यांग, अनाथ, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १३ | एस.एस.सी. नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १४ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १६ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |

**९.३** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**९.४** संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

**९.५** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**९.६ अर्जा**सोबत प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर करण्याबाबतची कार्यपद्धत आयोगाच्या क्रमांक एमआयएस-०१२०/सी.आर.२२/२०२३/मा.तं., दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार असेल.

**९.७ अर्जासोबत उमेदवारांची प्रमाणपत्रे/कागदपत्रे 'डिजिलॉकर' प्रणालीद्वारे सादर करण्यासाठी कार्यपध्दत आयोगाच्या क्रमांक ओएएस-०३२०/ .आर.०४/२०२६/मा.तं., दिनांक ०७ मे, २०२६ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार असेल.**

**९.८** जाहिरातीस अनुरून ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या पध्दतीबाबत तसेच अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क कशाप्रकारे भरणे आवश्यक आहे याबाबत उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांचे अवलोकन करुन त्यानुसार अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

**९.९ परीक्षा शुल्काचा भरणा:-**

**९.९.१ परीक्षा शुल्क (फी) :-**

| **शुल्क रुपये** | | |
|---|---|---|
| **अमागास** | **मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ** | **माजी सैनिक** (फक्त गट-क संवर्ग) |
| -- | २९४ | ४४ |

**९.९.२** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**९.९.३** परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

**९.९.४** अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणाऱ्या 'Submit and Pay fees' या बटनवर क्लिक केल्यानंतर किंवा मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या सदराखालील अर्ज केलेल्या पदांच्या यादीतील 'Fees not Paid' अशी सद्यस्थिती लिहिलेल्या जाहिरात/पद/परीक्षेसमोरील ' Pay Now' या लिंकवर क्लिक करुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

९.९.५ परीक्षा शुल्काचा भरणा खालील दोन पध्दतीने करता येईल:-

**(एक) ऑनलाईन पध्दतीने :-**

(१) भारतीय स्टेट बँक तसेच प्रणालीद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(२) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरून आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये.

(३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (status)लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(४) कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे करणे शक्य न झाल्यास अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर दोन दिवसापर्यंत परीक्षाशुल्काचा भरणा ऑफलाईन पद्धतीने करण्याकरीता चलनाची प्रत घेता येईल.

**(दोन) ऑफलाईन पध्दतीने :-** चलनाद्वारे

चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा विकल्प निवडल्यास उपलब्ध होणारी चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत विहित अंतिम दिनांकापूर्वी परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल. तथापि, चलनाची प्रत घेणे व बँकेत शुल्क जमा करणे, यामध्ये किमान तीन तासांचे कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

**९.९.६** परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या/अधिसूचनेच्या अनुषंगाने विहित दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

**९.९.७** विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

**१०. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

(१) जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा.

(२) हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा.

(३) शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.), क्रमांक : मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३ शासन पूरकपत्र, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व दिनांक १६ जुलै, २०१८ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी/वापरण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

(४) लिपिक- टंकलेखक संवर्गामध्ये निवड झालेल्या उमेदवारास संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्या कार्यालयातील कामकाजाच्या अनुषंगाने कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील. याबाबतचा तपशील संबंधित नियुक्ती प्राधिका-याकडून उमेदवाराना नियुक्ती पत्र/आदेशासोबत पुरविण्यात येईल.

(५) राज्यस्तरीय संवर्गामध्ये नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

**११. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**११.१** परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**११.३** प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

**११.४** परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

**११.५** परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**११.६** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**११.७** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१२. परीक्षेस प्रवेश** :-

संबंधित परीक्षेच्या प्रवेशप्रमाणपत्रावर नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेच्या उपस्थितीसाठी पात्र समजण्यात येईल.

**१३. निवडप्रकिया :-**

**१३.१** जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

**१३.२** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया "बेलिफ व लिपिक, गट-क (सेवाप्रवेश) नियम २०२२", दिनांक १८ मे, २०२२ अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाच्या संकेतस्थळावर "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये नमूद केल्यानुसार तसेच त्या-त्या वेळी उपलब्ध असणाऱ्या आयोगाच्या कार्यनियमावली राबविण्यात येईल .

**१४. शिफारस:-**

**१४.१ "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे करण्यात येतील.

**१४.२** गट-क सेवेतील सर्व संवर्गाकरीता लेखी परीक्षेमधून पात्र होण्याकरीता शतमत (Percentile) पध्दत लागू आहे.

**१४.३** प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी पात्र असतील:-

**(१) अमागास- किमान ३५ शतमत**
**(२) मागासवर्गीय - किमान ३० शतमत**
**(३) दिव्यांग - किमान २० शतमत**
**(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत**
**(५) माजी सैनिक - किमान २० शतमत**
**(६) अनाथ - किमान ३० शतमत**

**१४.४** समांतर आरक्षणाच्या आधारे किमान गुणांच्या सीमारेषेनुसार शिफारशीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारास कोणतीही एक सवलत देय राहील.

**१४.५** शिफारसपात्र उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**१४.६** शिफारशीनंतर नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, याबाबत उमेदवारांना प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

**१५. प्रमाणपत्र पडताळणी:-**

**१५.१** प्रस्तुत परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी निकालानंतर/नियुक्तीपूर्वी सक्षम प्राधिका-यांकडून बोलविण्यात येईल.

**१५.२** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल.

**१५.३** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**१५.४** विहित कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**१५.५** प्रमाणपत्र पडताळणी यासंदर्भात निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार तसेच निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**१५.६** केवळ अर्जातील दाव्यानुसार करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेले उमेदवार शिफारस/ नियुक्तीसाठी पात्र ठरतील.

**१६. कर्तव्ये व जबाबदा-या**:- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील **'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना'** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. **आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती तसेच जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.**

**१८.प्रस्तुत परीक्षेच्या आयोजनाच्या दिनांकास अन्य संस्थेची परीक्षा असल्यास उमेदवारास कोणती परीक्षा द्यावयाची आहे; याबाबतचा निर्णय उमेदवाराने स्वत: घेणे आवश्यक राहील.**

**१९.** आयोगास चुकीची माहिती सादर करणाऱ्या उमेदवारास सदर निवडप्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल. तसेच प्रस्तुत प्रकरणी " **उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " मधील **प्रकरण क्रमांक - नऊ** अनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**२०.** सदर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**२१. पदभरतीसंदर्भात काही अनुचित प्रकार घडल्यास महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून कार्यवाही करण्यात येईल.**

(सं. पां. देशमुख)
उप सचिव, (जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : नवी मुंबई.
दिनांक : १५ जून, २०२६

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.